# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 22 October 2024

## Time: 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: २२ ऑक्टोबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

जल जीवन मिशन अभियानामुळे ग्रामीण भारतातल्या नागरीकांच्या जीवनात परिवर्तन आल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत आज पाचव्या राष्ट्रीय जल पुरस्कारांचं वितरण केल्यानंतर त्या बोलत होत्या. पाणीसाठा वाढवणं आणि त्याचं संरक्षण याला प्रोत्साहन देण्यात येत आहे, मात्र भुमिगत जलप्रदूषण वाढत असून ठोस उपाययोजना करणं गरजेचं आहे, असं मत राष्ट्रपतींनी व्यक्त केलं. केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या वतीनं नऊ श्रेणींमध्ये ३८ जणांना हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये सर्वोत्कृष्ट राज्याच्या श्रेणीमध्ये प्रथम पारितोषिक ओडिशानं मिळवलं आहे, तर उत्तर प्रदेशनं दुसऱ्या क्रमांकाचं आणि तिसऱ्या क्रमांकाचं पारितोषिक गुजरात आणि पुद्दुचेरीनं संयुक्तपणे मिळवलं आहे. जल व्यवस्थापन आणि जलसंधारणाबाबत राष्ट्रीय स्तरावर जनजागृती करण्यासाठी सरकारनं व्यापक मोहीम हाती घेतली असून, राष्ट्रीय जल पुरस्कार हे जल समृद्ध भारताचं ध्येय साध्य करण्यासाठी देशभरातील व्यक्ती आणि संस्थांनी केलेल्या चांगल्या कामासाठी दिले जातात.

****

रशियात कझान या शहरात आयोजित १६ व्या ब्रिक्स शिखर परिषदेला उपस्थित राहण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी रवाना झाले. ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका या पाच देशांच्या ब्रिक्स समूहाची ही शिखर परिषद आजपासून सुरू होत आहे. केवळ जागतिक विकास आणि सुरक्षेसाठी बहुपक्षीयवादाचं बळकटीकरण अशी यावेळच्या या परिषदेची मध्यवर्ती संकल्पना आहे. या परिषदेत विविध विषयांवर विस्तृत चर्चा करण्यासाठी तसंच विविध नेत्यांची भेट घेण्यासाठी उत्सुक असून, ही रशिया भेट, उभय देशांमधल्या

धोरणात्मक भागीदारीला अधिक बळकट करेल, असं पंतप्रधान मोदी यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

****

विधानसभा निवडणुकीसाठीची अधिसूचना आज जारी झाली. या पार्श्वभूमीवर राज्यभरात नामनिर्देशन प्रक्रियेला आजपासून प्रारंभ होत आहे. येत्या २९ तारखेपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येणार असून, ३० तारखेला अर्जांची छाननी होणार आहे. चार नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत. नांदेड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी याच वेळापत्रकाप्रमाणे नामनिर्देशन प्रक्रिया पार पडणार आहे. सर्व ठिकाणी २० नोव्हेंबर रोजी मतदान आणि २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

****

झारखंडमधल्या विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातल्या ३८ जागांसाठीही आज अधिसूचना जाहीर होत आहे. इथंही महाराष्ट्राप्रमाणेच अर्ज भरणं आणि मतदानाचं वेळापत्रक आहे. झारखंडमध्ये पहिल्या टप्प्यातले अर्ज भरायची सुरुवात १८ तारखेलाच झाली असून अंतिम मुदत शुक्रवारपर्यंत आहे. पहिल्या टप्प्यात १३ नोव्हेंबरला मतदान होणार आहे.

****

बीडमधले भाजप नेते राजेंद्र मस्के यांनी आज मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली. म्हस्के यांनी दोन दिवसांपूर्वीच भाजपाच्या जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला.

****

नांदेड शहर तसंच अर्धापूर, हदगाव या तालुक्यात आज सकाळी सात वाजेच्या सुमारास भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. या भूकंपाची तीव्रता रिष्टर स्केलवर तीन पूर्णांक आठ इतकी नोंदवण्यात आली. भूकंपाचा केंद्रबिंदू नांदेड शहरापासून २९ किलोमीटर दूर उत्तरपूर्व दिशेला हदगाव तालुक्यातल्या सावरगाव या गावात आहे. नांदेड शहर आणि परिसर तसंच हिंगोली जिल्ह्यातल्या कळमनुरी, वसमत, औंढा तालुक्यातल्या अनेक भागातही हे धक्के जाणवले.

****

धाराशिव शहरातल्या खड्ड्यांच्या विरोधात जिल्हा व्यापारी महासंघाच्या पुढाकारातून विविध ३६ संघटनांनी काल शहरात बंद पाळला होता. मागील तीन वर्षांपासून शहरातले सर्व प्रमुख आणि अंतर्गत रस्त्यांची स्थिती गंभीर आहे. वेळोवेळी

नागरिक, विविध संघटनांनी याबाबत आवाज उठवला, मात्र प्रशासनाने गंभीर दखल न घेतल्यामुळे हा बंद पाळण्यात आला आणि जिल्हाधिकारी कार्यालयावर मूक मोर्चा काढण्यात आला. मोठ्या संख्येनं नागरीक या मोर्चात सहभागी झाले होते.

****

बीड जिल्ह्यातल्या सर्व विधानसभा मतदार संघातल्या माध्यम कक्ष, स्वीप आणि टपाली मतपत्रिका प्रक्रियेबाबतचं प्रशिक्षण काल पार पडलं. या निवडणुकीत मतदान अधिकाधिक व्हावं, यासाठी अधिकाधिक जनजागृतीवर भर द्यावा, अशा सूचना उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी यावेळी दिल्या.

****

धुळे शहरात महानगरपालिकेच्यावतीनं बचत गटातल्या महिलांची आज मतदान जनजागृती फेरी काढण्यात आली. उपायुक्त शोभा बाविस्कर यांच्या हस्ते या फेरीचा शुभारंभ करण्यात आला. मतदान जनजागृतीचे फलक घेऊन महिलांनी नागरीकांना मतदान करण्याचं आवाहन केलं. यावेळी महिलांना सामुहिक प्रतिज्ञा देण्यात आली. महिला आर्थिक विकास महामंडळातले कर्मचारी आणि बचत गटातल्या महिला योवळी उपस्थित होत्या.

****